# राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या हालचाली?

## पार्थ पवार यांनी शरद पवारांची भेट का घेतली? यावर सुप्रिया सुळे यांचा महत्वाचा खुलासा

महाईन्यूज । मुंबई

**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी सुरू आहेत. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा काही महिन्यांपासून सुरू आहेत. यातच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे खासदार पार्थ पवार यांनी नुकतीच शरद पवार यांची 'सिल्वर ओक' या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची चर्चा आहे. यावेळी पार्थ पवार आणि शरद पवार यांच्यात २ ते ३ तास चर्चा झाल्याचं बोललं जातं. या भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.**





पार्थ पवार यांनी शरद पवारांची भेट का घेतली? या भेटीत नेमकं कोणत्या विषयांवर चर्चा झाली? राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा बासनात पडलेला विषय तडीस नेण्याच्या या हालचाली सुरू आहेत का? याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज (१२ ऑगस्ट ) झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना भाष्य करत महत्वाचा खुलासा केला आहे.

लोकांच्या आयुष्यात चांगला बदल करण्यासाठी आणि लोकांना न्याय देण्यासाठी आम्ही आमचा पक्ष आणि संघटना काम करत आहे. त्यामुळे ज्या चर्चा सुरू असतात, त्या सुरूच असतात. आमचं नाणं मार्केटमध्ये चालतं, याचं आम्हाला समाधान आहे", अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

"सर्वात महत्वाचं म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या देशातील सर्वच पक्षाचे नेते हे शरद पवार यांना भेटत असतात. त्यामुळे सुनील तटकरे किंवा प्रफुल पटेल किंवा पार्थ पवार हे शरद पवारांना का भेटले? याचं उत्तर शरद पवार हेच देऊ शकतील. पण आम्ही सर्वांनी अनेक वर्ष एकत्र काम केलेलं आहे. त्यामुळे गाठीभेटी होत असतात", असं स्पष्टीकरण सुप्रिया सुळे यांनी दिलं आहे.

यासोबतच शरद पवार यांना देशभरातील विविध पक्षांचे नेते भेटत असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे एखाद्या नेत्याने शरद पवारांची भेट घेतली म्हणून त्यामागे लगेच राजकीय समीकरण जोडणे योग्य ठरणार नाही, असा सूचक संदेश त्यांनी दिला.

"सर्वात महत्वाचं म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या देशातील सर्वच पक्षांचे नेते शरद पवार यांना भेटत असतात. त्यामुळे सुनील तटकरे, प्रफुल पटेल किंवा पार्थ पवार हे शरद पवारांना का भेटले? याचं उत्तर शरद पवार हेच देऊ शकतील. पण आम्ही सर्वांनी अनेक वर्षे एकत्र काम केलेलं आहे. त्यामुळे गाठीभेटी होत असतात," असे स्पष्टीकरण सुप्रिया सुळे यांनी दिले. सुप्रिया सुळे यांच्या या प्रतिक्रियेमुळे विलीनीकरणाच्या चर्चांना थेट दुजोरा मिळालेला नसला, तरी त्यांनी त्या शक्यतेला स्पष्टपणे नाकारलेलेही नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये पडद्यामागे काही राजकीय हालचाली सुरू आहेत का, याबाबतची उत्सुकता कायम आहे.

### सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी मागच्या वेळी शरद पवार यांची भेट घेतल्याचं बोललं जात होतं. त्यानंतर आता पार्थ पवार हे शरद पवार यांची भेट घेतात. मग या भेटीमागे नेमकं काय घडतंय? नेमकी काय चर्चा सुरू आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा सुरू आहेत का? असा प्रश्न पत्रकारांनी सुप्रिया सुळे यांना विचारला. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "मी टीव्हीवर अनेकदा अशा चर्चा पाहत असते. मात्र, आज आपल्या राज्यासमोर जी आव्हाने आहेत, त्याच्या कामाला आमचा पक्ष लागलेला आहे. लोकांच्या आयुष्यात चांगला बदल करण्यासाठी आणि लोकांना न्याय देण्यासाठी आम्ही आमचा पक्ष लागलेला आहे.

## 'अमित शाह यांना उपपंतप्रधान व्हायचे आहे'; पृथ्वीराज चव्हाण यांचे मोठे विधान

महाईन्यूज । मुंबई

**काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राजकीय कारकिर्द शेवटाकडे आली असल्याचे म्हटले होते. पंतप्रधान मोदींच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू असून मोदी सरकार बॅकफूटवर आहे, असे विधान राहुल गांधी यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भाष्य केले.**



भाजपामध्ये अंतर्गत वाद सुरू असल्याचे सांगताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "अमित शाह म्हणत आहेत, मला उपपंतप्रधान करा. म्हणजे मी पुढचा चेहरा असेन. नव्या चेहऱ्याचा शोध सुरू आहे. ही मोदी सरकारच्या शेवटाची सुरुवात झाली आहे. अडीच वर्षांत हे काही होणार नाही. आम्ही २०२९ ची वाट पाहू. महात्मा गांधींच्या शांततेच्या मार्गाने देशात निश्चितच सत्ताबदल होईल."

"पंतप्रधान मोदी यांनी आजवर केलेल्या खोट्या घोषणा खपून गेल्या. १५ लाख रुपये खात्यात टाकणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, नोटबंदीमुळे ५० दिवस मागणे, लॉकडाऊनमध्ये केलेल्या घोषणा खपून गेल्या. गुजरात मॉडेल, विश्वगुरू वगैरेही हवेत विरून गेले. युवकांनी या घोषणा उघड्या पाडल्या आहेत. ही बोगसगिरी आता चालणार नाही, हे युवकांनी सांगितले आहे. त्यामुळेच पंतप्रधान मोदी, मोहन भागवत युवकांबरोबर बोलत आहेत", अशी टीका पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिक्षण मंत्री होतील असे म्हटले जाते, असा प्रश्न यावेळी चव्हाण यांना विचारला गेला. त्यावर ते म्हणाले की, आम्ही फडणवीस यांना शिक्षण मंत्री म्हणून स्वीकारू शकत नाहीत. अर्थात हा अधिकार सरकारचा आहे. ते कुणालाही नेमू शकतात. पण आमचा त्याला विरोध असेल.

देवेंद्र फडणवीस हे सक्षम असतील, त्यात वाद नाही. पण ते शिक्षण मंत्री म्हणून उपयुक्त ठरू शकणार नाहीत, असे विधान पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. ते म्हणाले, फडणवीस यांचा कायदा व सुव्यवस्थेचा कारभार आपण पाहिला. नीट पेपरफुटीचे केंद्र महाराष्ट्र राहिले. त्यावर त्यांना नियंत्रण आणता आले नाही.

### केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून फडणवीसांना आमचा विरोध

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारकडे एकही व्यक्ती नाही जो या पदाचा भार स्वीकारू शकेल, असेही चव्हाण म्हणाले. शिक्षण मंत्री म्हणून त्यांना एखादा शिक्षण तज्ज्ञ व्यक्ती किंवा एखादा निवृत्त सनदी अधिकारी त्यांना या पदासाठी आणावा लागेल. शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती ते आणणार नाहीत. कारण संघाच्या मुशीतील लोकांना शिक्षण क्षेत्रात बसवले गेले असून ते सर्व सुमार दर्जाचे लोक आहेत, असा आरोप चव्हाण यांनी केला.